# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

## : परिपत्रक क्र. १८९/२०२६ :

या परिपत्रकाद्वारे आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावली व मार्गदर्शक तत्वात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे आणि आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण योजना व विद्यार्थी कल्याण अधिकारी मानधनासंदर्भातील जे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले, त्याबाबतची माहिती खाली नमूद करण्यात येत आहे.

१) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या रूपये ५५/– प्रतितास या मानधनात वाढ करुन **दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६ पासून हा दर रूपये ६५/– प्रतितास** एवढा करण्यात येत आहे. मानधनाची रक्कम पूर्वीप्रमाणेच धनादेशाद्वारे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी.

२) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या मानधनात दिनांक ०१ ऑगस्ट, २०२६ पासून वाढ करण्यात आली आहे. महाविद्यालय/परिसंस्थेच्या एकूण नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात कमाल अनुदानात नैसर्गिकरित्या वाढ करणे आवश्यक असल्याने या मानधनात झालेल्या वाढीचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणाऱ्या सर्व महाविद्यालय/परिसंस्थांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे कमाल अनुदान देय असेल.

| अ.क्र. | **महाविद्यालय व परिसंस्थेतील नियमित प्रवेशित विद्यार्थी संख्या** | **शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून झालेली सुधारित अनुदानाची कमाल मर्यादा (मानधन रू. ६५ नुसार)** |
|---|---|---|
| १. | ०००१ ते ०५०० | रु. १,०८,०००/– |
| २. | ०५०१ ते १००० | रु. २,१६,०००/– |
| ३. | १००१ ते १५०० | रु. ३,२४,०००/– |
| ४. | १५०१ ते २००० | रु. ४,३१,९००/– |
| ५. | २००१ ते २५०० | रु. ५,३९,९००/– |
| ६. | २५०१ ते ३००० | रु. ६,४७,९००/– |
| ७. | ३००१ ते ३५०० | रु. ७,५५,८००/– |
| ८. | ३५०१ ते ४००० | रु. ८,६३,८००/– |
| ९. | ४००१ ते ४५०० | रु. ९,७१,८००/– |
| १०. | ४५०१ ते ५००० | रु. १०,७९,७००/– |
| ११ | ५००१ ते ५५०० | रु. ११,८७,७००/– |
| १२ | ५५०१ ते ६००० | रु. १२,९५,७००/– |
| १३ | ६००१ ते ६५०० | रु. १४,०३,७००/– |
| १४ | ६५०१ ते ७००० | रु. १५,११,६००/– |
| १५ | ७००१ ते ७५०० | रु. १६,१९,६००/– |
| १६ | ७५०१ ते ८००० | रु. १७,२७,६००/– |
| १७ | ८००१ ते ८५०० | रु. १८,३५,५००/– |
| १८ | ८५०१ ते ९००० | रु. १९,४३,५००/– |
| १९ | ९००१ ते ९५०० | रु. २०,५१,५००/– |
| २० | ९५०१ ते १०००० | रु. २१,५९,४००/– |
| २१ | १०००१ ते १०५०० | रु. २२,६७,४००/– |
| २२ | १०५०१ ते ११००० | रु. २३,७५,४००/– |
| २३ | ११००१ ते ११५०० | रु. २४,८३,४००/– |
| २४ | ११५०१ ते १२००० | रु. २५,९१,३००/– |

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना अनुदान देताना महाविद्यालयाच्या एकूण नियमित विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वरीलप्रमाणेच कमाल अनुदान देय असेल आणि **या अनुदानाच्या कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त झालेला खर्च हा योजना राबविणाऱ्या संबंधित संलग्न व स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्थेनी स्वत: करावयाचा आहे**.

४) सद्यस्थितीत 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' या योजनेत सहभागी सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेची असलेली टक्केवारी ही ९०:१० (विद्यापीठाकडून ९०% व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून १०%) आहे. सद्यस्थितितील सदर ९०:१० (विद्यापीठाकडून ९०% व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून १०%) हीच टक्केवारी कायम ठेवण्यात येऊन याच टक्केवारीनुसार पुढील कालावधीत अनुदान देय असेल

५) 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' ही योजना अर्थार्जन करणारी योजना ठरावी या उद्देशाने महाविद्यालय/परिसंस्थेच्या परिसराचा, महाविद्यालय/परिसंस्थेच्या भौगोलिक परिस्थितीचा, महाविद्यालय/परिसंस्थेत असणाऱ्या स्थायी स्वरूपातील भौतिक सोयी–सुविधा यांची उपलब्धता लक्षात घेऊन संलग्न व स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थां यांनी त्यांच्या पातळीवर इतर स्त्रोत्राच्या माध्यमातून या योजनेकरिता अर्थतरतूद उपलब्ध करण्यासंदर्भात भरघोस प्रयत्न करावेत.

६) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण ही योजना एकत्रित सहभागाने समूह/गटाने न राबविता प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेत स्वतंत्ररित्या राबविण्याकरिता आयोजक महाविद्यालय/परिसंस्थेस रू. ८,०००/– पर्यंतची आर्थिक तरतूद करण्यात येत आहे.

७) विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या मानधनाच्या गटांमध्ये असलेल्या योजना व शैक्षणिक उपक्रम यामध्ये गटनिहाय फेररचना करण्यात आली आहे. त्यानुसार सदर गट खालीलप्रमाणे असतील आणि या गटनिहाय योजना/उपक्रमांच्या अंमलबजावणीनुसार मानधन निर्धारित असेल.

| **'अ' गट (आवश्यक)** | **मानधन रक्कम रू. ६,०००/–<br>(रू. ६,००० मानधन विभागणी)** |
|---|---|
| १) रॅगिंग अहवाल<br>२) विद्यार्थी विकास निधी प्रचलित नियमांप्रमाणे<br>३) विद्यार्थी परिषद स्थापना<br>४) नियतकालिक स्पर्धेतील सहभाग<br>५) विद्यार्थी वार्ता प्रकाशन<br>५) विद्यार्थी सुरक्षा विमा योजना<br>६) युवक महोत्सवात सहभाग<br>७) आपत्कालिन सहाय्य.<br>८) विद्यार्थी प्रोत्साहन योजना<br>९) स्वच्छ/समर्थ भारत अभियान<br>१०) विद्यार्थी विकास मंडळामार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या परिपत्रकांची कार्यवाही व अहवाल | |
| **'ब' गट** | |
| कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना | रु. ४,०००/– |
| **'क' गट** | |
| १) निर्भय कन्या अभियान<br>किंवा<br>आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण | रु. १,०००/– |
| **वरील 'क' गटातील किमान एक योजना राबविणे आवश्यक आहे.** | |

...३...

| 'ड' गट<br>इतर शैक्षणिक, सह शैक्षणिक, उप शैक्षणिक, उपक्रम/कार्यशाळा /शिबिर | मानधन रक्कम |
|---|---|
| १) कौशल्य प्रशिक्षणपूरक उपक्रम/कार्यशाळा<br>२) रोजगार/स्वयंरोजगार आणि कौशल्य विकास योजना<br>३) विद्यार्थी समुपदेशन<br>४) सायबर सुरक्षा/जागरूकता<br>५) व्यक्तिमत्व विकास विषयक<br>६) रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजना कार्यशाळा<br>७) अंमली पदार्थ विरोधी जनजागृती/जाणीव जागृती<br>८) नियतकालिक कार्यशाळा<br>९) विद्यार्थी प्रतिनिधी शिबिर<br>१०)विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्रवेशित परराज्यातील विद्यार्थी सांस्कृतिक व आदान प्रदान कार्यशाळा<br>११) सामाजिक सलोखा आणि युवा सक्षमीकरण<br>१२) दिव्यांग धोरणांस अनुकुल उपक्रम—'विशेष विद्यार्थी' कार्यशाळा (अंध, अपंग, शारीरिक विकलांग इ.)<br>१३) अभिरूप संसद.<br>१४) अभिरुप न्यायालय.<br>१५) या व्यतिरिक्त इतर सांस्कृतिक आणि इतर बहुविध उपक्रम/ कार्यशाळा/शिबिर<br>१६) महाविद्यालयांच्या भौगोलिक परिस्थितीनुरूप स्थानिक संसाधनाना पूरक/सहाय्यभूत इतर शैक्षणिक/सांस्कृतिक उपक्रम/कार्यशाळा/ परिषद/चर्चासत्र/सांस्कृतिक स्पर्धा | रु. १,०००/— |
| **वरील 'ड' गटातील किमान एक योजना राबविणे आवश्यक आहे.** | |

विद्यार्थी कल्याण अधिकारी मानधन अदा करताना वरीलप्रमाणे गटनिहाय योजना व उपक्रम राबविणे अनिवार्य राहिल.

शैक्षणिक वर्ष २०२६—२७ पासून सदर सुधारित नियम व निकषांनुसार विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना गटनिहाय राबविलेल्या योजना व उपक्रमानुसार मानधन अदा करण्यात येईल.

८) **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेबाबतचे नियम व मार्गदर्शक तत्त्वे हे वरील बदल वगळता पूर्वीप्रमाणेच पुढील नियमावली वा पुनर्रचना निर्धारित होईपर्यंत लागू राहतील.**

**वरील परिपत्रकाचा आशय संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.**

**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे — ७
दिनांक : २० ऑगस्ट, २०२६
जावक क्र. :२०२६—२७/२१४

(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :</u>**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.
३. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग.